# प्रसिध्दीपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ १८०७ /२०२५ पुणे दिनांक - ०४ /०३ /२०२५

लष्कर वाहतुक विभागाअंतर्गत पुणे कॅन्टोन्मेंट अंतर्गत कृष्ण कन्हैय्या सोसायटी ते खाणे मारुती चौक घर नं. १५२ याठिकाणी दिनां ०३/३/२०२५ ते दिनांक ०२/०४/२०२५ या कालावधीत ड्रेनेज लाईन टाकणेचे काम होणार असल्याने महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/ सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (ए) (बी), ११६ (४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, लष्कर विभागातील नमुद रस्त्यावर दिनांक ०५/०३/२०२५ ते दिनांक ०२/०४/२०२५ पर्यंत खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

## लष्कर वाहतूक विभाग, पुणे अंतर्गत

१. ईस्ट स्ट्रीट रोडवरून ट्रायलक हॉटेलकडे जाताना खाणे मारुती चौकातील राईट टर्न बंद करण्यात येत आहे.
   **पर्यायी मार्ग :-** खाणे मारुती चौकातून डावीकडे वळुन पुलगेट कडे उजवीकडे वळुन सरळ गोळीबार चौकातुन उजवीकडे वळुन वाय जंक्शन वरून एम.जी. रोडने ट्रायलक हॉटेल चौकातुन इच्छितस्थळी जावे
२. गोळीबार चौक वाय जंक्शन वरुन खाणे मारुती चौकाकडे जाणाऱ्या चालकांना लेफ्ट टर्न बंद करण्यात येत आहे.
   **पर्यायी मार्ग :-** खाणे मारुती चौकातून सरळ इस्टस्ट्रीट रोडने व्होल्गा चौकात येवून डावीकडे जाणे किंवा इंदिरा गांधी चौकातून डावीकडुन इच्छितस्थळी जावे.
३. गोळीबार चौक वाय जंक्शन ते ट्रायलक हॉटेल चौक तसेच ट्रायलक हॉटेल चौक ते खाणे मारुती चौक रोडवर दोन्ही बाजूस नो पार्कीग करण्यात येत आहे.
४. ट्रायलक चौकाकडुन खाणे मारुती चौकाकडील नो एंट्री आदेश तात्पुरता स्वरूपात रद्द करण्यात येत आहे.
५. गोळीबार चौक वाय जंक्शन येथुन खाणे मारुती चौकाकडे फक्त बसेस, ट्रक जातील व डावीकडे न वळता सरळ इस्टस्ट्रीट कडे किंवा सोलापूर रोडकडे इच्छितस्थळी जातील.
६. गोळीबार चौक वाय जंक्शन येथुन एम.जी. रोडने फक्त कार, रिक्षा, दुचाकी जातील व पुढे ट्रायलक चौकातून उजवीकडे वळुन खाणे मारुती चौकातून इस्टस्ट्रिट कडे किंवा सोलापूर रोडकडे इच्छितस्थळी जातील.

पोलीस उपआयुक्त वाहतुक विभाग, पुणे.

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर.

प्रति,

१)**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक** , पुणे शहर.
**३)पोलीस निरिक्षक, प्रेसरूम**, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
४) **प्रभारी अधिकारी येरवडा** वाहतुक विभाग, पुणे शहर.
**५)पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

Scanned with CamScanner